MPSCKEEDA

UPSC, MPSC, COMBINE गट ब गट क, तलाठी, पोलीस भरती

एकच ॲप – अनलिमिटेड अभ्यासक्रम, अनलिमिटेड सराव!

संपूर्ण नोट्स +
अनलिमिटेड TEST सिरीज

टॉपिकनुसार नोट्स + PYQ

प्रत्येक विषयाच्या टॉपिकनुसार नोट्स + टॉपिकचे

100 PYQ प्रत्येक विषय

LIVE + कोणत्याही वेळेत टेस्ट सिरीज

टॉपिकनुसार, प्रत्येक टॉपिकचे 25 प्रश्नांचे

50 संच ऑल महाराष्ट्र रँकिंग

मिनी मॉक टेस्ट

संपूर्ण विषय किंवा कोणतेही दोन विषय
• 25 प्रश्न

200 टेस्ट विश्लेषणासहित

फुल मॉक टेस्ट

संपूर्ण पेपर स्वरूपात

200 टेस्ट विश्लेषणासहित

दिवाळी ऑफर

₹499 / एक वर्ष

किंवा

₹99 प्रति महिना

आत्ताच डाउनलोड करा

JOIN NOW • MPSCKEEDA APP

Google Play Store वर उपलब्ध • या पानावर कुठेही टॅप करा

इतिहास वन लायनर नोट्स – भाग 2

1857 चा उठाव ते राष्ट्रीय चळवळ व क्रांतिकारक

एकूण 175 महत्त्वाचे एक-ओळ मुद्दे • उत्तर ठळक अक्षरात

UPSC | MPSC | COMBINE गट ब | गट क | तलाठी | पोलीस भरती

1. 1857 चा उठाव व इतर बंडे (17)
2. महाराष्ट्रातील उठाव व क्रांतिकारक (9)
3. राष्ट्रीय चळवळ : काँग्रेस, गांधीयुग, परिषदा व चळवळी (103)
4. क्रांतिकारक, नेते व राजकीय संघटना (46)

विभाग 1

1857 चा उठाव व इतर बंडे

मुद्दे 1 ते 17

1 1857 च्या उठावात क्रांतिकारकांनी **बहादूरशहा दुसरा** याला दिल्लीचा बादशहा घोषित केले (मे 1857); सप्टेंबर 1857 मध्ये **विल्यम हडसन** याने दिल्ली पुन्हा ताब्यात घेतली.

2 1857 च्या उठावात **कानपूर**चे नेतृत्व **नानासाहेब पेशवे** (सेनापती तात्या टोपे) यांनी केले; कानपूरजवळ **बिठूर** हे प्रमुख केंद्र होते.

3 कानपूरचा उठाव **जनरल कॅम्पबेल** याने मोडला; तात्या टोपे यांना 1859 मध्ये फाशी देण्यात आली; नानासाहेब नेपाळमध्ये निघून गेले.

4 1857 च्या उठावाचे केंद्र व नेते : झाशी — **राणी लक्ष्मीबाई**; लखनौ — **बेगम हजरत महल**; कानपूर — **नानासाहेब व तात्या टोपे**; बिहार (जगदीशपूर) — **कुंवरसिंह**; दिल्ली — बहादूरशहा.

5 **वीर बाबुराव शेडमाके** (गोंड सरदार) यांनी **1857** च्या उठावात चांदा (चंद्रपूर/गडचिरोली) जिल्ह्यात नेतृत्व केले.

6 **मंगल पांडे** यांनी 29 मार्च 1857 रोजी **बराकपूर** छावणीत मेजर **ह्यूसन** वर पहिली गोळी झाडली; त्यांना 8 एप्रिल 1857 रोजी फाशी देण्यात आली.

7 1857 च्या उठावाची नियोजित तारीख **31 मे 1857** होती; प्रत्यक्ष उठावाला **10 मे 1857** रोजी **मीरत** येथून सुरुवात झाली.

8 1857 च्या उठावाची कारणे : **काडतूस प्रकरण (चरबीचे काडतूस)**, धार्मिक-सामाजिक हस्तक्षेप, दत्तक वारसा नामंजूर (खालसा धोरण), सैनिकांतील असंतोष, तैनाती फौजेचे धोरण.

9 **खालसा (दत्तक वारस नामंजूर) धोरण** लॉर्ड **डलहौसी** याने राबवले; तैनाती फौजेची पद्धत लॉर्ड **वेलस्ली** याने सुरू केली.

10 **1857 च्या उठावाला** 'स्वातंत्र्य युद्ध' (स्वातंत्र्यसमर) असे प्रथम **वि. दा. सावरकर** यांनी संबोधले (ग्रंथ : '1857 चे स्वातंत्र्यसमर').

11 सावरकरांशिवाय 1857 ला शिपायांचे बंड म्हणणारे : सर जॉन सीले, सर जॉन लॉरेन्स; 'राष्ट्रीय उठाव' म्हणणारे : डिझरायली.

12 **1899 चा बीडचा उठाव (बीड कट)** सदाशिव नीळकंठ जोशी यांनी घडवण्याचा प्रयत्न केला; त्यासाठी निधी व मदत मिळवण्यासाठी फ्रान्स व रशियाकडे गुप्त लोक पाठवले गेले; उठाव फसला.

13 **1921 चे मोपला बंड** (मोपला विद्रोह) **केरळ** (मलबार) मध्ये जमीनदार व ब्रिटिशांविरुद्ध झाले; नेतृत्व **वरियमकुन्नाथ कुंजाहम्मद हाजी** यांनी केले.

14 पंजाबमधील **कुका (नामधारी)** विद्रोहाचे नेतृत्व **राम सिंह** यांनी केले; हा शीख धर्मातील शुद्धीकरणाचा संप्रदाय होता.

15 **कोळी समाजाने 1828** मध्ये **रामजी भांगरे (भांगडिया)** यांच्या नेतृत्वाखाली ब्रिटिशांविरुद्ध उठाव केला; कॅप्टन अलेक्झांडर व मॅकिंटॉश यांनी तो मोडला.

16 **कुका (नामधारी) चळवळ** — पंजाबमध्ये **गुरु रामसिंग** यांनी स्वदेशी पंचायत व स्वदेशी न्यायव्यवस्था अशी प्रतिसरकारसदृश व्यवस्था उभारली.

17 **संथाळांचे बंड (1855)** — **सिद्धू व कान्हू** यांच्या नेतृत्वाखाली राजमहल (बिहार/झारखंड) येथील संथाळ आदिवासींनी जमीनदार-सावकारांविरुद्ध उठाव केला; नंतर 'संथाळ परगणा' जिल्हा तयार झाला.

विभाग 2

महाराष्ट्रातील उठाव व क्रांतिकारक

मुद्दे 18 ते 26

18 **भिल्ल उठाव** (खानदेश, 1818–20); **कोळी उठाव** (1828, रामजी भांगरे); **रामोशी उठाव** (उमाजी नाईक, वासुदेव फडके); **गडकरी बंड** (कोल्हापूर, 1844); **सातारा-सावंतवाडी** उठाव.

19 **नाशिकचा कट (1909–10)** — सावरकरांच्या अभिनव भारत सोसायटीशी संबंधित; **अनंत कान्हेरे** यांनी जिल्हाधिकारी **जॅक्सन** यांची हत्या केली (21 डिसेंबर 1909); फाशी 1910.

20 **बाबाराव सावरकर** यांना नाशिक कटात जन्मठेप; **विनायक सावरकर** यांना अंदमान (काळे पाणी) — 1911 पासून.

21 महाराष्ट्रात इंग्रजांविरुद्ध **सशस्त्र लढा** सर्वप्रथम **उमाजी नाईक** (रामोशी, 1826–32) यांनी दिला; त्यांना 1832 मध्ये पुण्यात फाशी देण्यात आली; स्मारक **भिवडी (पुणे)** येथे आहे.

22 **वासुदेव बळवंत फडके** यांना **'आद्य क्रांतिकारक'** म्हणतात; जन्म **शिरढोण** (रायगड) 4 नोव्हेंबर 1845; 1879 मध्ये रामोशी, भिल्ल, कोळी, धनगर यांना संघटित करून सशस्त्र उठाव केला.

23 वासुदेव बळवंत फडके यांचा बंडाचा पैसा सावकार व इंग्रजांवर दरोडे घालून उभारला; त्यांना जुलै 1879 मध्ये देवर नावडगी (कर्नाटक) येथे अटक झाली; **ग. वा. जोशी (सार्वजनिक काका)** यांनी त्यांचे वकीलपत्र घेतले.

24 फडके यांना **जन्मठेप** झाली; एडन (येमेन) येथील तुरुंगात **क्षयरोगाने 1883** मध्ये त्यांचा मृत्यू झाला; ग्रंथ — 'दत्त महात्म्य'; संस्था — ऐक्यवर्धिनी सभा.

25 **रंगो बापूजी गुप्ते** हे सातारचे छत्रपती प्रतापसिंह यांचे गेलेले राज्य परत मिळवण्यासाठी इंग्लंडला गेले; 1857 चा उठाव सुरू झाला तेव्हा त्यांनी रामोशी, मांग यांचे सैन्य उभारण्याचा प्रयत्न केला.

नोट्स, PDF, TEST सिरीज साठी - Mpsckeeda हे ॲप डाउनलोड करा

26 **चाफेकर बंधू** (दामोदर, बाळकृष्ण, वासुदेव) यांनी 1897 मध्ये पुण्यात प्लेग कमिशनर **रँड** याचा वध केला; दामोदर चाफेकर यांना फाशी देण्यात आली (पहिले राजकीय खून).

विभाग 3

राष्ट्रीय चळवळ : काँग्रेस, गांधीयुग, परिषदा व चळवळी

मुद्दे 27 ते 129

27 काँग्रेस अधिवेशने : **1885 मुंबई** (डब्ल्यू. सी. बॅनर्जी), **1886 कलकत्ता** (दादाभाई नौरोजी), **1905 बनारस** (गोखले), **1906 कलकत्ता** (दादाभाई), **1907 सुरत** (रासबिहारी घोष), **1916 लखनौ** (अंबिकाचरण मजुमदार), **1917 कलकत्ता** (ॲनी बेझंट), **1920 नागपूर** (विजयराघवाचार्य), **1925 कानपूर** (सरोजिनी नायडू), **1929 लाहोर** (नेहरू), **1931 कराची** (वल्लभभाई पटेल), **1938 हरिपुरा** (सुभाषचंद्र बोस), **1939 त्रिपुरी** (बोस/राजेंद्र प्रसाद).

28 **1929 च्या लाहोर काँग्रेस** अधिवेशनात (अध्यक्ष नेहरू) **पूर्ण स्वराज्याचा ठराव**; **26 जानेवारी 1930** हा स्वातंत्र्य दिन म्हणून साजरा झाला.

29 **1931 कराची अधिवेशन** (अध्यक्ष सरदार पटेल) — मूलभूत हक्क व आर्थिक कार्यक्रमाचा ठराव.

30 **दादाभाई नौरोजी** यांना **'भारताचे वयोवृद्ध पितामह'** म्हणतात; 'Poverty and Un-British Rule in India' ग्रंथ; ब्रिटिश संसदेचे पहिले भारतीय सदस्य (1892, फिन्सबरी).

31 **स्वदेशी चळवळ** — बंगालच्या फाळणीविरुद्ध 7 ऑगस्ट 1905 रोजी कलकत्ता टाऊन हॉलमध्ये प्रारंभ; **16 ऑक्टोबर 1905** राखीबंधन; **बंगभंग** रद्द 1911.

32 **कलकत्ता काँग्रेस 1906** — चार ठराव : स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण, स्वराज्य.

33 **लखनौ करार (1916)** — काँग्रेस व मुस्लिम लीग यांच्यात (टिळक व जीना); जहाल-मवाळ पुन्हा एकत्र.

34 **गांधीजी** — दक्षिण आफ्रिकेतून **9 जानेवारी 1915** रोजी भारतात परतले (प्रवासी भारतीय दिवस); **गुरू — गोपाळ कृष्ण गोखले**; साबरमती आश्रम (1917).

35 **1930 — दांडी यात्रा**; **1932 — पुणे करार**; **1934** — सविनय कायदेभंग मागे; **1940** — वैयक्तिक सत्याग्रह (पहिले सत्याग्रही विनोबा भावे, दुसरे नेहरू); **1942** — चले जाव.

36 **कॅबिनेट मिशन (1946)** — सदस्य पेथिक लॉरेन्स, स्टॅफर्ड क्रिप्स, ए. व्ही. अलेक्झांडर; **अंतरिम सरकार** (2 सप्टेंबर 1946) — पंतप्रधान नेहरू.

37 **16 ऑगस्ट 1946** — मुस्लिम लीगचा **'प्रत्यक्ष कृती दिन'** (Direct Action Day) — कलकत्ता दंगली; **पाकिस्तान ठराव** — लाहोर, 23 मार्च 1940.

38 **मोर्ले-मिंटो सुधारणा कायदा** म्हणजेच **1909** चा भारतीय परिषद कायदा; त्यात मुस्लिमांना स्वतंत्र मतदारसंघ दिले (भारतमंत्री मोर्ले, व्हाईसरॉय मिंटो).

39 **जातीय निवाडा** इंग्लंडचे पंतप्रधान **रॅम्से मॅकडोनाल्ड** यांनी **16 ऑगस्ट 1932** रोजी जाहीर केला; मुस्लिम, शीख, ॲंग्लो-इंडियन, दलित इत्यादींना स्वतंत्र मतदारसंघ मिळाले.

40 जातीय निवाड्याच्या विरोधात गांधीजींनी येरवडा तुरुंगात उपोषण केले; त्यातून **पुणे करार** (24 सप्टेंबर 1932, गांधी–आंबेडकर) झाला.

नोट्स, PDF, TEST सिरीज साठी - Mpsckeeda हे ॲप डाउनलोड करा

41 **रौलेट कायदा (1919)** — चौकशीशिवाय कोणालाही अटक करण्याचा/तुरुंगात टाकण्याचा अधिकार सरकारला दिला; याला 'काळा कायदा' म्हणतात (अपील, वकील, दलील नाही).

42 रौलेट कायद्याविरुद्ध गांधीजींनी **6 एप्रिल 1919** रोजी देशव्यापी हरताळाचे आवाहन केले; मुंबईत गांधीजी व सरोजिनी नायडू यांनी सत्याग्रह सभा घेतली.

43 **दुसऱ्या गोलमेज परिषदेत** (1931) गांधीजी काँग्रेसचे एकमेव प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते; **डॉ. बाबासाहेब आंबेडकर** तिन्ही गोलमेज परिषदांना उपस्थित होते.

44 राष्ट्रीय काँग्रेसच्या पहिल्या महिला अध्यक्ष **ॲनी बेझंट** (1917, कलकत्ता); पहिल्या भारतीय महिला अध्यक्ष **सरोजिनी नायडू** (1925, कानपूर).

45 काँग्रेसमध्ये जहाल-मवाळ अशी फूट **1907** च्या **सुरत** अधिवेशनात पडली; अध्यक्ष **रासबिहारी घोष** होते.

46 **फैजपूर** (जि. जळगाव) येथे डिसेंबर **1936** मध्ये काँग्रेसचे 50 वे अधिवेशन भरले; हे पहिले **ग्रामीण भागातील** अधिवेशन होते; अध्यक्ष **जवाहरलाल नेहरू**.

47 भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना **28 डिसेंबर 1885** रोजी मुंबईच्या **गोकुळदास तेजपाल संस्कृत पाठशाळेत** झाली; संस्थापक **ए. ओ. ह्युम**; पहिले अध्यक्ष **व्योमेशचंद्र बॅनर्जी**.

48 **खेडा सत्याग्रह** (1918, गुजरात) हा **शेतकऱ्यांसाठी** (अन्यायी शेतसारा वसुलीविरुद्ध) गांधीजी व वल्लभभाई पटेल यांनी केलेला सत्याग्रह होता.

49 **जालियनवाला बाग** हत्याकांड (13 एप्रिल 1919, अमृतसर) याची चौकशी **हंटर कमिशनने** केली; गोळीबाराचा आदेश जनरल **डायरने** दिला.

50 जालियनवाला बाग (अमृतसर, पंजाब) येथे 13 एप्रिल 1919 रोजी बैसाखीच्या दिवशी जनरल **डायरने** निःशस्त्र लोकांवर गोळीबार केला; डॉ. सत्यपाल व सैफुद्दीन किचलू यांच्या अटकेचा निषेध करण्यासाठी सभा भरली होती.

51 जालियनवाला बाग हत्याकांडाच्या निषेधार्थ **रवींद्रनाथ टागोर** यांनी इंग्रजांनी दिलेली 'सर' (नाईटहूड) पदवी परत केली.

52 **1919 चा भारत सरकार कायदा** म्हणजेच **माँटेग्यू-चेम्सफोर्ड सुधारणा** कायदा; त्यात प्रांतांत **द्विदल राज्यपद्धती** (Dyarchy) सुरू झाली.

53 **सायमन कमिशन** 1928 मध्ये भारतात आले; त्यात सात ब्रिटिश सदस्य होते, एकही भारतीय नव्हता; त्याविरुद्ध 'सायमन गो बॅक' अशी घोषणा झाली.

54 **महात्मा गांधीजींचे** 'वन मॅन आर्मी' असे वर्णन **लॉर्ड माउंटबॅटन** यांनी केले.

55 **चौरीचौरा** हे ठिकाण **उत्तर प्रदेश** (गोरखपूर) येथे आहे; फेब्रुवारी 1922 मध्ये जमावाने पोलीस ठाणे जाळल्याने 22 पोलीस मृत्युमुखी पडले.

56 **चौरीचौरा** घटनेमुळे गांधीजींनी **असहकार चळवळ** स्थगित केली (फेब्रुवारी 1922).

57 गांधीजींचा भारतातील पहिला सत्याग्रह **चंपारण** (बिहार, 1917) — **नीळ** पिकवण्याच्या सक्तीविरुद्ध (तीनकठिया पद्धत) शेतकऱ्यांसाठी झाला.

58 गांधीजींचे पहिले उपोषण **अहमदाबाद गिरणी कामगार** लढ्यात (1918) झाले.

59 **पुणे करार** (24 सप्टेंबर 1932, येरवडा तुरुंग) — **डॉ. आंबेडकर व महात्मा गांधी** यांच्यात झाला; दलितांना स्वतंत्र मतदारसंघाऐवजी सर्वसाधारण मतदारसंघात राखीव जागा मिळाल्या.

नोट्स, PDF, TEST सिरीज साठी - Mpsckeeda हे ॲप डाउनलोड करा

60 **'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच'** हे उद्गार **लोकमान्य टिळक** यांचे (1916, बेळगाव).

61 टिळकांना **'भारतीय असंतोषाचे जनक'** असे **व्हॅलेंटाईन चिरोल** यांनी संबोधले.

62 चळवळींची वर्षे : **असहकार — 1920**; **सविनय कायदेभंग — 1930**; **चले जाव — 1942**.

63 **गोपाळ कृष्ण गोखले** हे महात्मा गांधींचे राजकीय गुरू होते; गांधीजींवर **रस्किन** च्या 'अन्टू धिस लास्ट' पुस्तकाचा प्रभाव पडला.

64 **चले जाव ठरावाचा मसुदा जवाहरलाल नेहरू** यांनी तयार केला; ठराव वर्धा कार्यकारिणीत संमत होऊन मुंबईच्या अधिवेशनात (**8 ऑगस्ट 1942**) मंजूर झाला; घोषणा — 'करेंगे या मरेंगे'.

65 **चले जाव (भारत छोडो / ऑगस्ट क्रांती)** चळवळ **8 ऑगस्ट 1942** रोजी सुरू झाली; 'ऑगस्ट क्रांती मैदान' (गवालिया टँक, मुंबई) येथे घोषणा झाली.

66 **खान अब्दुल गफारखान** ('बादशहा खान', 'सरहद्द गांधी') हे वायव्य सरहद्द प्रांताचे पठाण नेते; त्यांनी **खुदाई खिदमतगार** (लाल डगलेवाले) संघटना स्थापली; ते भारतरत्न मिळवणारे पहिले अभारतीय.

67 **माणगाव (कोल्हापूर)** येथे 21–22 मार्च 1920 रोजी डॉ. आंबेडकरांनी **अस्पृश्यता निवारण परिषद** घेतली; अध्यक्ष **छत्रपती शाहू महाराज**.

68 **असहकार चळवळ** 1 ऑगस्ट 1920 रोजी सुरू झाली (गांधीजींचे नेतृत्व); 1920 मध्ये माणगाव परिषद, मूकनायक व असहकार चळवळ या तिन्ही घटना घडल्या.

69 महात्मा गांधींचे पूर्ण नाव **मोहनदास करमचंद गांधी**; जन्म **2 ऑक्टोबर 1869** (पोरबंदर); आईचे नाव **पुतलीबाई**.

70 **बारडोली सत्याग्रह** (1928, गुजरात) चे नेते **सरदार वल्लभभाई पटेल**; शेतसारा वाढीविरुद्ध लढ्यात यश आल्याने शेतकऱ्यांनी त्यांना **'सरदार'** ही पदवी दिली.

71 **मुळशी सत्याग्रह** (1921–24) चे नेतृत्व **सेनापती बापट** (पांडुरंग महादेव बापट) यांनी केले; टाटांच्या धरणामुळे विस्थापित शेतकऱ्यांसाठी हा लढा होता; यामुळे त्यांना 'सेनापती' ही पदवी मिळाली.

72 **भूदान चळवळीचे जनक आचार्य विनोबा भावे** (1951, पोचमपल्ली, तेलंगणा).

73 **वैयक्तिक सत्याग्रहाचे (1940) पहिले सत्याग्रही आचार्य विनोबा भावे**; दुसरे जवाहरलाल नेहरू.

74 **सविनय कायदेभंग चळवळीचा** कालावधी **1930–34**; सुरुवात दांडी यात्रेने (12 मार्च 1930, मीठाचा सत्याग्रह).

75 सविनय कायदेभंगात कर न भरणे, कायदे मोडणे, विदेशी मालावर बहिष्कार, सरकारी शाळा/कार्यालयांवर बहिष्कार हे कार्यक्रम होते.

76 **चंपारण सत्याग्रह (1917)** — बिहारमधील शेतकऱ्यांवर जमिनीच्या 3/20 भागात **नीळ** लावण्याची सक्ती (**तीनकठिया पद्धत**) होती; गांधीजींनी सत्याग्रह करून अन्याय दूर केला.

77 चंपारण व खेडा सत्याग्रह **शेतकऱ्यांच्या** प्रश्नांसाठी तर अहमदाबादचा लढा **गिरणी कामगारांसाठी** होता.

78 काँग्रेसच्या वर्धा बैठकीत (जुलै 1942) **भारत छोडो** ठराव मांडला गेला; मुंबई अधिवेशनात (8 ऑगस्ट 1942) तो संमत होऊन आंदोलन सुरू झाले.

79 सुरत अधिवेशन (काँग्रेसचे 23 वे) मूळ **नागपूर** येथे होणार होते; जहालांचा प्रभाव जास्त असल्याने ते सुरतला हलवले गेले; **1916 च्या लखनौ अधिवेशनात** जहाल-मवाळ पुन्हा एकत्र आले.

नोट्स, PDF, TEST सिरीज साठी - Mpsckeeda हे ॲप डाउनलोड करा

80 **होमरूल लीग (स्वराज्य संघ)** ची स्थापना **ॲनी बेझंट** यांनी **अडयार (मद्रास)** येथे (सप्टेंबर 1916) केली; टिळकांची होमरूल लीग एप्रिल 1916 मध्ये **बेळगाव** येथे सुरू झाली.

81 **दुसरी गोलमेज परिषद 1931** मध्ये लंडन येथे भरली; (पहिली 1930, तिसरी 1932).

82 **धारासना** (गुजरात) येथील मिठाच्या सत्याग्रहाचे नेतृत्व **सरोजिनी नायडू** यांनी केले (गांधीजींच्या अटकेनंतर, 1930).

83 **दांडी यात्रा (मिठाचा सत्याग्रह)** — साबरमती ते दांडी (12 मार्च–6 एप्रिल 1930); महाराष्ट्रात **बापूजी अणे** यांनी यवतमाळ जिल्ह्यात **जंगल सत्याग्रह** केला.

84 काँग्रेसचे **पहिले अध्यक्ष व्योमेशचंद्र बॅनर्जी** (1885, मुंबई); पहिल्या अधिवेशनात **72 प्रतिनिधी** उपस्थित होते.

85 काँग्रेस स्थापनेत **ए. ओ. ह्यूम** (निवृत्त ब्रिटिश सनदी अधिकारी) यांचा पुढाकार होता; त्यांना **विल्यम वेडरबर्न, हेन्री कॉटन** व व्हाईसरॉय **लॉर्ड डफरिन** यांचे सहाय्य मिळाले; स्थापनेच्या वेळी व्हाईसरॉय **लॉर्ड डफरिन** होते.

86 **दादाभाई नौरोजी** (1886, 1893, 1906), **जॉर्ज युल** (पहिले इंग्रज अध्यक्ष, 1888) व **ॲनी बेझंट** (1917) हे काँग्रेसचे अध्यक्ष होते; **लोकमान्य टिळक** कधीही काँग्रेसचे अध्यक्ष झाले नाहीत.

87 **'जन गण मन'** रवींद्रनाथ टागोर यांनी मूळ बंगालीत लिहिले; ते प्रथम **27 डिसेंबर 1911** रोजी कोलकत्ता काँग्रेस अधिवेशनात गायले गेले (अध्यक्ष बिशन नारायण दर).

88 **जन गण मन** राष्ट्रगीत म्हणून घटना समितीने **24 जानेवारी 1950** रोजी स्वीकारले; गायनाचा कालावधी **52 सेकंद** आहे.

89 **1906 च्या कलकत्ता अधिवेशनाचे अध्यक्ष दादाभाई नौरोजी** होते; त्यांनी **'स्वराज्य'** हे राष्ट्रीय चळवळीचे ध्येय प्रथमच जाहीर केले; 'चळवळ करा, अखंड चळवळ करा' असा संदेश दिला.

90 **1905 चे बनारस अधिवेशन** — अध्यक्ष **गोपाळ कृष्ण गोखले**; यात बंगालच्या फाळणीचा तीव्र निषेध केला गेला.

91 **1916 चे लखनौ अधिवेशन** — अध्यक्ष **अंबिकाचरण मुजुमदार**; येथे काँग्रेस व मुस्लिम लीग यांच्यात **लखनौ करार** झाला (काँग्रेसने स्वतंत्र मतदारसंघ मान्य केले).

92 **काँग्रेस समाजवादी पक्ष** 1934 मध्ये स्थापन झाला; संस्थापकांत **जयप्रकाश नारायण**, आचार्य नरेंद्र देव, राम मनोहर लोहिया, मिनू मसानी हे होते (नाशिक तुरुंगात कल्पना; पाटणा येथे स्थापना).

93 योजनांचा कालक्रम : **क्रिप्स योजना (1942)** → **राजाजी योजना (1944)** → **वेव्हेल योजना (1945)** → **त्रिमंत्री योजना / कॅबिनेट मिशन (1946)**.

94 व्हाईसरॉयांचा कालक्रम : **लॉर्ड कॅनिंग** → **लॉर्ड रिपन (1880–84)** → **लॉर्ड डफरिन (1884–88)** → **लॉर्ड कर्झन (1899–1905)**.

95 **1942 चा चले जाव** काळात महाराष्ट्रात नंदुरबार (शिरीषकुमार), चिमूर, आष्टी, यावली येथे लोकांनी बंड केले.

96 टिळकांच्या होमरूल लीगचे कार्यक्षेत्र — महाराष्ट्र (मुंबई वगळून), कर्नाटक, मध्य प्रांत व वऱ्हाड; उर्वरित भारत ॲनी बेझंट यांच्याकडे; माँटेग्यू–चेम्सफोर्ड सुधारणांनंतर बेझंट यांनी चळवळ थांबवली.

97 **'एक गाव एक पाणवठा'** ही चळवळ **डॉ. बाबा आढाव** यांनी सुरू केली (1970 च्या दशकात).

नोट्स, PDF, TEST सिरीज साठी - Mpsckeeda हे ॲप डाउनलोड करा

98 **स्वराज्य पक्ष** जानेवारी **1923** मध्ये **चित्तरंजन दास** (अध्यक्ष) व **मोतीलाल नेहरू** (सचिव) यांनी असहकार चळवळ स्थगित झाल्यावर स्थापन केला; कायदेमंडळात प्रवेश हा त्याचा हेतू.

99 **मुस्लिम लीग**ची स्थापना **1906** मध्ये ढाका येथे **नवाब सलिमुल्ला** यांनी केली (आगा खान यांचा सहभाग).

100 **महाराष्ट्रातील होमरूल चळवळीचे प्रणेते लोकमान्य टिळक** होते.

101 जहाल नेत्यांची **चतुःसूत्री — स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण** (टिळक, लाला लजपतराय, अरविंद घोष, बिपिनचंद्र पाल).

102 **दादाभाई नौरोजी** यांनी **संपत्तीचे अपहरण (Drain of Wealth)** सिद्धांत मांडला; गोखले — चतुःसूत्री नव्हे; ॲनी बेझंट — होमरूल चळवळ; जगन्नाथ शंकरशेठ — बॉम्बे असोसिएशन.

103 **वायकोम सत्याग्रह (1924–25)** — त्रावणकोर (केरळ) येथे अस्पृश्यांना **मंदिरांजवळील रस्त्यांवर चालण्याचा** (मंदिर प्रवेशाच्या दिशेने) हक्क मिळावा म्हणून; नेतृत्व टी. के. माधवन, के. पी. केशव मेनन.

104 **ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस (AITUC)** ची स्थापना **31 ऑक्टोबर 1920** रोजी झाली; पहिले अध्यक्ष **लाला लजपतराय**; INTUC (1947) हे काँग्रेसप्रणीत संघटन आहे.

105 **रौलेट कायदा** सिडने रौलेट समितीच्या शिफारशीनुसार 1919 मध्ये संमत झाला; त्यामुळे पंजाबमध्ये असंतोष वाढला व जालियनवाला बाग हत्याकांड झाले.

106 **दांडी यात्रा** — 12 मार्च 1930 रोजी गांधीजी 78 अनुयायांसह साबरमतीहून निघाले; 24 दिवसांत सुमारे 385 किमी चालून 5 एप्रिल रोजी दांडीला पोहोचले व **6 एप्रिल 1930** रोजी मिठाचा कायदा मोडला.

107 **जस्टीस पार्टी** ही दक्षिणेतील ब्राह्मणेतर चळवळ **टी. एम. नायर व पी. त्यागराज** यांनी स्थापन केली; तिचे रूपांतर पुढे रामस्वामी नायकर (पेरियार) यांच्या **द्रविडर कळघम (1944)** व अण्णादुराई यांच्या **द्रविड मुन्नेत्र कळघम (DMK)** मध्ये झाले.

108 **'चालले तू मीठ मुठभर, साम्राज्याचा खचला पाया'** असे **सविनय कायदेभंग चळवळी**चे वर्णन केले जाते.

109 **दहीहंडा (अकोला) सत्याग्रह** — खाऱ्या विहिरीच्या पाण्यापासून मीठ तयार करून कायदेभंग केला; नेतृत्व **बापूसाहेब सहस्रबुद्धे** यांनी केले.

110 कालक्रम : **मोर्ले-मिंटो (1909)** → **माँटेग्यू-चेम्सफर्ड (1919)** → **चौरीचौरा (1922)** → **दांडी यात्रा (1930)**.

111 **चले जाव** — वर्धा कार्यकारिणीने 14 जुलै 1942 रोजी ठराव मंजूर केला; **8 ऑगस्ट 1942** रोजी मुंबईच्या **गवालिया टँक** मैदानावर जवाहरलाल नेहरूंनी मांडलेला ठराव संमत झाला; गांधीजींचा संदेश — **'करा किंवा मरा'**.

112 **चले जाव चळवळ** मुंबईतून सुरू झाली; मुंबई हे या चळवळीचे प्रमुख केंद्र होते; महाराष्ट्रात आष्टी (वर्धा), चिमूर (चंद्रपूर), नंदुरबार, सातारा येथे तीव्र आंदोलन झाले.

113 **आष्टी (जि. वर्धा)** येथे **16 ऑगस्ट 1942** रोजी (नागपंचमी) पोलीस ठाण्यासमोर शांततेत आंदोलन करणाऱ्यांवर गोळीबार होऊन स्वातंत्र्य सैनिक शहीद झाले.

114 **दादाभाई नौरोजी** (जन्म 4 सप्टेंबर 1825, नवसारी) यांना **'भारताचे पितामह' (Grand Old Man of India)** व भारतीय अर्थशास्त्राचे जनक म्हणतात.

नोट्स, PDF, TEST सिरीज साठी - Mpsckeeda हे ॲप डाउनलोड करा

115 दादाभाई नौरोजी हे **एल्फिन्स्टन कॉलेजमधील पहिले भारतीय प्राध्यापक** (1853); त्यांनी **'रास्त गोफ्तार'** (1851) साप्ताहिक सुरू केले; **ब्रिटिश संसदेवर (हाऊस ऑफ कॉमन्स) निवडून आलेले पहिले भारतीय** (1892, फिन्सबरी मतदारसंघ).

116 दादाभाई नौरोजी हे जहाल व मवाळ यांच्यातील सुवर्णमध्य साधणारे नेते होते; ते 1886, 1893 व 1906 मध्ये काँग्रेसचे अध्यक्ष झाले.

117 **असहकार चळवळ** — **1 ऑगस्ट 1920** पासून सुरू; सप्टेंबर 1920 च्या कलकत्ता विशेष अधिवेशनात (अध्यक्ष लाला लजपतराय) ठराव; **डिसेंबर 1920 च्या नागपूर अधिवेशनात** मान्यता; शाळा, न्यायालये, कायदेमंडळे व परदेशी मालावर बहिष्कार.

118 **1908 च्या खटल्यात** टिळकांचे वकीलपत्र **बॅरिस्टर मोहम्मद अली जिना** यांनी घेतले; टिळकांना केसरीतील लेखांबद्दल (देशाचे दुर्दैव, हे उपाय टिकाऊ नाहीत) **सहा वर्षे काळ्या पाण्याची** शिक्षा झाली व मंडालेच्या तुरुंगात ठेवले गेले.

119 गांधीजी **1893** मध्ये दक्षिण आफ्रिकेतील **नाताळ** येथे गेले; 1894 मध्ये नाताळ इंडियन काँग्रेस स्थापन केली; 1906 मध्ये ट्रान्सवाल येथे सत्याग्रहाचा पहिला प्रयोग; **9 जानेवारी 1915** रोजी भारतात परतले (प्रवासी भारतीय दिन).

120 **मुळशी सत्याग्रह** (1921–24) — पुणे जिल्ह्यातील **मुळा नदीवर टाटा कंपनीच्या धरणा**मुळे 54 गावे पाण्याखाली जाणार होती म्हणून; 16 एप्रिल 1921 रोजी सुरुवात; नेतृत्व सेनापती बापट; बापट यांना शिक्षा झाली.

121 सायमन कमिशन **8 नोव्हेंबर 1927** रोजी सर जॉन सायमन यांच्या अध्यक्षतेखाली नेमले; **3 फेब्रुवारी 1928** रोजी ते प्रथम मुंबईला आले; एकही भारतीय सदस्य नसल्याने 'सायमन परत जा' अशी घोषणा झाली.

122 **सविनय कायदेभंग चळवळ (1930–34)** — गांधीजींनी 14 फेब्रुवारी 1930 रोजी आदेश दिला; एप्रिल 1934 मध्ये चळवळ पूर्णतः मागे घेतली.

123 ब्रिटिश पंतप्रधान **क्लेमेंट ॲटली** यांनी **20 फेब्रुवारी 1947** रोजी जून 1948 पूर्वी भारताला सत्ता हस्तांतरित करण्याची घोषणा केली.

124 **सुरेंद्रनाथ बॅनर्जी** यांनी डिसेंबर **1883** मध्ये **कोलकत्ता** येथे **नॅशनल कॉन्फरन्स** भरवली; त्यांनी 'इंडियन असोसिएशन' (1876) स्थापन केली.

125 **शिरोडा (सिंधुदुर्ग)** येथे डॉ. आठल्ये, आचार्य जावडेकर व विनायकराव भुस्कुटे यांच्या नेतृत्वाखाली **मिठाचा सत्याग्रह** झाला (1930).

126 **अमरावती** येथे मिठाच्या सत्याग्रहाचे नेतृत्व **वीर वामनराव जोशी** यांनी केले; ते नाटककार, कवी व पत्रकार होते; त्यांनी 'स्वतंत्र हिंदुस्थान' साप्ताहिक चालवले.

127 **धारासना** सत्याग्रहात सुमारे 2000 लोक सहभागी झाले; गांधीजींचे पुत्र **मणिलाल** व इमाम साहेब सहभागी; अमेरिकन पत्रकार **वेब मिलर** यांनी पोलिसांच्या अत्याचाराचे वर्णन केले.

128 **पहिली गोलमेज परिषद** 12 नोव्हेंबर 1930 ते 19 जानेवारी 1931 लंडनमध्ये भरली; उद्घाटन **राजे पंचम जॉर्ज** यांनी केले; अध्यक्ष रॅम्से मॅकडोनाल्ड; 89 प्रतिनिधी.

129 **गांधी–आयर्विन करार (5 मार्च 1931)** नुसार गांधीजी **दुसऱ्या गोलमेज परिषदेस** (7 सप्टेंबर–1 डिसेंबर 1931) उपस्थित राहिले; **तिसरी** परिषद 17 नोव्हेंबर–24 डिसेंबर 1932 (काँग्रेसचा बहिष्कार).

नोट्स, PDF, TEST सिरीज साठी - Mpsckeeda हे ॲप डाउनलोड करा

विभाग 4

क्रांतिकारक, नेते व राजकीय संघटना

मुद्दे 130 ते 175

130 **भगतसिंग** — **'हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन असोसिएशन'**; **8 एप्रिल 1929** रोजी केंद्रीय असेंब्लीत बॉम्ब; **23 मार्च 1931** रोजी लाहोर तुरुंगात फाशी (सुखदेव, राजगुरू सोबत); 'इन्कलाब झिंदाबाद'.

131 **चंद्रशेखर आझाद** — 27 फेब्रुवारी 1931 रोजी अल्फ्रेड पार्क (अलाहाबाद) येथे पोलिसांशी लढताना शहीद; **काकोरी कट (9 ऑगस्ट 1925)** — रामप्रसाद बिस्मिल, अशफाकउल्ला खान, राजेंद्र लाहिरी, रोशन सिंग यांना फाशी.

132 **खुदीराम बोस** (1908, मुझफ्फरपूर बॉम्ब) — सर्वात तरुण शहीद; **अलीपूर बॉम्ब कट** — अरविंद घोष, बारींद्र घोष; **अनुशीलन समिती** (बंगाल).

133 **लाला हरदयाळ, सोहनसिंग भाकना** — **गदर पक्ष (1913), सॅन फ्रान्सिस्को**; **कामागाटा मारू** प्रकरण (1914) — बाबा गुरदित सिंग.

134 **सावरकर** — 'मित्रमेळा' (1899) → 'अभिनव भारत' (1904); 1910 मध्ये लंडनमध्ये अटक; मार्सेलिसजवळ पळाले; 1911 अंदमानमध्ये 50 वर्षे शिक्षा; **26 फेब्रुवारी 1966** रोजी निधन.

135 **उधमसिंग** यांनी 13 मार्च 1940 रोजी लंडनच्या कॅक्सटन हॉलमध्ये **मायकेल ओडवायर** (जालियनवाला बागेच्या वेळचा पंजाबचा गव्हर्नर) यांची हत्या केली; 31 जुलै 1940 रोजी फाशी.

136 **लाल-बाल-पाल** : लाला लजपतराय, **बाळ गंगाधर टिळक**, **बिपिनचंद्र पाल** — जहाल गटातील त्रयी.

137 **भगतसिंग, सुखदेव व राजगुरू** यांना **23 मार्च 1931** रोजी फाशी देण्यात आली; म्हणून 23 मार्च **'शहीद दिन'**.

138 **शिरीषकुमार** हा नंदुरबार येथील विद्यार्थी 1942 च्या चले जाव आंदोलनातील गोळीबारात शहीद झाला (9 सप्टेंबर 1942).

139 **स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर** यांचा जन्म **28 मे 1883** रोजी **भगूर** (नाशिक) येथे झाला.

140 सावरकरांनी **1899–1900** मध्ये **मित्रमेळा** स्थापन केला; त्याचे रूपांतर पुढे **अभिनव भारत (1904)** मध्ये झाले; मॅझिनीच्या 'यंग इटली'पासून प्रेरणा.

141 सावरकरांनी **मॅझिनीचे चरित्र**, **'1857 चे स्वातंत्र्यसमर'**, **'माझी जन्मठेप'**, **'हिंदुत्व'** हे ग्रंथ लिहिले; 1911 मध्ये त्यांना **पन्नास वर्षे काळ्या पाण्याची** (अंदमान) शिक्षा झाली.

142 सावरकर **1938** च्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते; 1937 मध्ये काँग्रेस सत्तेत आल्यावर त्यांची सुटका झाली.

143 **अनंत कान्हेरे** यांनी **21 डिसेंबर 1909** रोजी नाशिकचे कलेक्टर **जॅक्सन** यांचा **विजयानंद थिएटर** मध्ये वध केला; बाबाराव सावरकरांना काळ्या पाण्याची शिक्षा दिल्याचा हा बदला होता; कान्हेरे **अभिनव भारत** संघटनेशी संबंधित होते.

144 **मादाम भिकाजी कामा** यांनी 1907 मध्ये **स्टुटगार्ट (जर्मनी)** येथे आंतरराष्ट्रीय समाजवादी परिषदेत भारताचा राष्ट्रध्वज फडकवला (त्यांच्यासोबत सरदारसिंह राणा).

नोट्स, PDF, TEST सिरीज साठी - Mpsckeeda हे ॲप डाउनलोड करा

145 **काकोरी कट (9 ऑगस्ट 1925)** — **हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशन** ची संघटना; यात रामप्रसाद बिस्मिल, अशफाक उल्लाखान, रोशनसिंग, राजेंद्र लाहिरी यांचा सहभाग.

146 **मीरत कट (1929)** — सम्राटाला भारताच्या सार्वभौमत्वापासून वंचित करण्याचा कट केल्याच्या आरोपावरून कामगार नेत्यांवर खटला; **चितगाव शस्त्रागार लूट (1930)** — सूर्य सेन; लाहोर कट खटला — भगतसिंग.

147 **आझाद हिंद सेना** 1942 मध्ये **रासबिहारी बोस** (जपान) यांनी स्थापन केली; नेतृत्व **सुभाषचंद्र बोस** (सिंगापूर, 1943) यांनी केले; घोषवाक्य **'जय हिंद', 'चलो दिल्ली'**.

148 आझाद हिंद सेनेने **अंदमान व निकोबार** बेटे जिंकून त्यांना **'शहीद' व 'स्वराज'** अशी नावे दिली; सेनेच्या तुकड्या — गांधी, नेहरू, आझाद, सुभाष व झाशीची राणी (महिला).

149 **प्रतिसरकार (सातारा)** चे नेते **क्रांतिसिंह नाना पाटील**; **तुफान सेना** कुंडल (सांगली) येथे **जी. डी. (बापू) लाड** यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झाली; ती कर गोळा करणे, कायदा-सुव्यवस्था राखणे ही कामे करी.

150 22 जुलै 1932 रोजी पुण्याच्या **फर्ग्युसन महाविद्यालयात** विद्यार्थी **वासुदेव बळवंत गोगटे** यांनी मुंबईचे हंगामी गव्हर्नर **हॉटसन** यांच्यावर गोळ्या झाडल्या (नेम चुकला).

151 **उधमसिंग** यांनी 1940 मध्ये लंडन येथे **मायकल ओडवायर** याचा वध करून जालियनवाला बाग हत्याकांडाचा बदला घेतला; जालियनवाला बागेच्या वेळी ओडवायर पंजाबचा लेफ्टनंट गव्हर्नर होता.

152 **चितगाव शस्त्रागार लूट** (18 एप्रिल 1930, बंगाल) ची योजना **सूर्य सेन** यांनी आखली; त्यात अनंत सिंग, गणेश घोष, कल्पना दत्त, प्रीतिलता वड्डेदार (महिला) यांचा सहभाग होता.

153 **मदनलाल धिंग्रा** यांनी **1 जुलै 1909** रोजी लंडन येथे **कर्झन वायली** (भारतमंत्र्यांचा स्वीय सहाय्यक) याची हत्या केली; त्यांना 17 ऑगस्ट 1909 रोजी पेंटनव्हिल तुरुंगात फाशी झाली; ते इंडिया हाऊस/ अभिनव भारतशी संबंधित होते.

154 **महादेव चिमणाजी आपटे** व **गणेश वासुदेव जोशी (सार्वजनिक काका)** यांनी वासुदेव बळवंत फडके यांचे वकीलपत्र घेतले.

155 **चाफेकर बंधू** (दामोदर, बाळकृष्ण, वासुदेव) हे **चिंचवड (पुणे)** येथील; त्यांनी **22 जून 1897** रोजी प्लेग कमिशनर **रँड** व लेफ्टनंट **आयर्स्ट** यांचा वध केला (त्या दिवशी राणी व्हिक्टोरियाच्या राज्यारोहणाच्या हीरक महोत्सवाचा सोहळा होता).

156 रँडच्या हत्येची माहिती देणाऱ्या **गणेश द्रविड** या फितुराला वासुदेव चाफेकर व **महादेव विनायक रानडे** यांनी ठार केले; तिन्ही चाफेकर बंधू व रानडे यांना फाशी झाली.

157 **प्रतिसरकार (सातारा)** चे संस्थापक **क्रांतिसिंह नाना पाटील**; इंग्रजांना शेवटपर्यंत दाद न देणारे हे एकमेव प्रतिसरकार होते.

158 **अभिनव भारत** ही **नाशिक** येथील पहिली सशस्त्र क्रांतिकारी संघटना; सावरकरांनी वयाच्या 16 व्या वर्षी (नोव्हेंबर 1899) नाशिकमध्ये म्हसकर व पागे यांच्या सहाय्याने **राष्ट्रभक्त समूह** स्थापन केला, त्याची शाखा **मित्रमेळा** (1900) व पुढे **अभिनव भारत** (1904).

159 सुभाषचंद्र बोस यांनी **1939** मध्ये **फॉरवर्ड ब्लॉक** स्थापन केला; **इंडियन इंडिपेन्डन्स लीग** रासबिहारी बोस यांनी स्थापन केली (दादाभाईंशी संबंधित नव्हती).

160 **रासबिहारी बोस** (जन्म 25 मे 1886) हे गदर कटाचे प्रमुख संयोजक; 1943 मध्ये त्यांनी आझाद हिंद सेनेचे नेतृत्व सिंगापूरमध्ये सुभाषचंद्र बोस यांच्याकडे सोपवले.

नोट्स, PDF, TEST सिरीज साठी - Mpsckeeda हे ॲप डाउनलोड करा

161 **स्वतंत्र मजूर पक्ष** (Independent Labour Party) **डॉ. बाबासाहेब आंबेडकर** यांनी **15 ऑगस्ट 1936** रोजी स्थापन केला; मुखपत्र — 'जनता'; 1938 च्या मनमाड परिषदेत 'ब्राह्मणशाही आणि भांडवलशाही हे कामगारांचे दोन शत्रू' असे ते म्हणाले.

162 **इंडिया हाऊस (लंडन)** ची स्थापना **श्यामजी कृष्ण वर्मा** यांनी केली; त्यांनी 'इंडियन होमरूल सोसायटी' व 'द इंडियन सोशिऑलॉजिस्ट' सुरू केले व तरुणांसाठी **'शिवाजी शिष्यवृत्ती'** दिली; सावरकर या शिष्यवृत्तीने लंडनला गेले.

163 **गदर पक्ष (1913)** — **लाला हरदयाळ** यांनी अमेरिकेतील सॅन फ्रान्सिस्को येथे स्थापन केला; 'गदर' साप्ताहिकावरून नाव; रामचंद्र व बरकतुल्ला हे सहकारी.

164 **आझाद हिंद सेनेच्या महिला तुकडी 'राणी झाशी रेजिमेंट'** चे नेतृत्व **कॅप्टन लक्ष्मी स्वामीनाथन (सहगल)** यांनी केले.

165 आझाद हिंद सेनेचे ब्रीदवाक्य — **'इत्तेहाद (विश्वास), इत्तेफाक (एकता), कुर्बानी (बलिदान)'**; युद्धघोषणा — 'चलो दिल्ली'; बोधचिन्ह — झेप घेणारा वाघ.

166 **रासबिहारी बोस** हे 1912 मध्ये व्हाईसरॉय **लॉर्ड हार्डिंग** वरील बॉम्बहल्ल्याचे सूत्रधार; ते जपानला गेले व टोकियो येथे **इंडियन इंडिपेन्डन्स लीग** स्थापन केली.

167 **अप्पासाहेब पटवर्धन** यांना **'कोकणचे गांधी'** म्हणतात; खान अब्दुल गफारखान — सरहद्द गांधी.

168 चले जाव चळवळीतील **भूमिगत चळवळीचे नेतृत्व जयप्रकाश नारायण** यांनी केले (हजारीबाग तुरुंगातून निसटून); राम मनोहर लोहिया, अरुणा असफ अली व उषा मेहता (काँग्रेस रेडिओ) यांचाही सहभाग.

169 **सुभाषचंद्र बोस** यांचा जन्म **23 जानेवारी 1897** रोजी कटक (ओरिसा) येथे झाला; 1920/21 मध्ये ICS उत्तीर्ण होऊनही नोकरी केली नाही; 1923 मध्ये स्वराज्य पक्षात प्रवेश.

170 **21 ऑक्टोबर 1943** रोजी सुभाषचंद्र बोस यांनी सिंगापूर येथे **आझाद हिंद सरकार** (हंगामी सरकार) स्थापन केले.

171 **मादाम भिकाजी कामा** यांनी 1904–07 च्या सुमारास **भारताच्या ध्वजाची पहिली रूपरेषा** तयार केली (हिरवा, पिवळा, केशरी पट्टे; आठ कमळे; 'वंदे मातरम्'; सूर्य-चंद्र) व तो 1907 मध्ये स्टुटगार्ड येथे फडकवला.

172 **लाला लजपतराय** — **'पंजाब केसरी'**; 1894 मध्ये पंजाब नॅशनल बँकेची स्थापना; लाल–बाल–पाल (लाला लजपतराय — पंजाब, बाळ गंगाधर टिळक — महाराष्ट्र, बिपिनचंद्र पाल — बंगाल) हे जहाल नेते.

173 **सायमन कमिशन** विरोधी निदर्शनात (लाहोर, 30 ऑक्टोबर 1928) लाठीमाराने जखमी झालेल्या लाला लजपतराय यांचे **17 नोव्हेंबर 1928** रोजी निधन झाले; त्याचा सूड म्हणून भगतसिंग, राजगुरू यांनी सँडर्सची हत्या केली.

174 **'चलो दिल्ली'** हा नारा व **'तुम मुझे खून दो, मैं तुम्हें आज़ादी दूँगा'** हे आवाहन **नेताजी सुभाषचंद्र बोस** यांचे; आझाद हिंद सरकारला जपान, जर्मनी, इटली, ब्रह्मदेश आदी देशांनी मान्यता दिली.

175 भारतीय नागरी सेवेत (ICS) दाखल होणारे पहिले भारतीय **सत्येंद्रनाथ टागोर** (1863; मुंबई केडर); **सुरेंद्रनाथ बॅनर्जी** हे ICS मध्ये (1869) निवडले गेले पण बडतर्फ झाले.

सर्व विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी हार्दिक शुभेच्छा! — Mpsckeeda

नोट्स, PDF, TEST सिरीज साठी - Mpsckeeda हे ॲप डाउनलोड करा